# प्रकरण - ५

# * निष्कर्ष *

[ पृष्ठ क्र. ८७ ते १०० ]

## * प्रकरण - ५ वे *

## * निष्कर्ष *

मागील प्रमुख तीन प्रकरणांचा विचार केला असता तेलुगु समाजाचे व त्याच्या नेतृत्वाचे स्पष्ट चित्र समजून येते. १५० वर्षांपूर्वी साधारणपणे तेलुगु विणकर समाज सोलापूरमध्ये आला. तेंव्हापासून आजपर्यंतच्या कालावधीत त्यांनी सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांमध्ये बदल घडवून आणले. त्यासंबंधीचे विवेचन मागील प्रकरणांमध्ये केले आहे. ते करीत असताना काही निष्कर्ष किंवा वैशिष्ठये दिसून आली. त्याचा थोडक्यात आढावा घेणे उचित ठरते.

नेतृत्व निर्माण होण्यासाठी, तत्पूर्वी नेतृत्व करू इच्छिणा-या व्यक्तिने राजकीय सहभाग प्रस्थापित करावा लागतो. म्हणजेच राजकीय क्षेत्रामध्ये काम करावे लागते. ही कामे अनेक मार्गांचा वापर करून करता येतात. उदा- लोकांचे प्रश्न उचलून धरणे, त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे, त्यासाठी कधी उपोषणाचा, कधी मोर्चे -मिरवणूकांचा, संबंधित अधिकारी किंवा नेत्यांशी संपर्क साधण्याचा मार्ग अवलंबावा लागतो. समाजात राजकीय जागृती घडवावी लागते. व हरत-हेने लोकांचे मत आपल्या बाजूने करावे लागते. अशा निरनिराळया अनेक पध्दतींनी राजकीय सहभाग प्रदर्शित करून आपले स्थान महत्वपूर्ण बनवावे लागते. आपली ओळख समाजात निर्माण करावी लागते. तेंव्हा नेतृत्वाचा मार्ग खुला होतो.

वास्तविक पहाता कोणत्याही क्षेत्रात नेतृत्व करणे सहज किंवा सोपे नसते. त्यासाठी नेतृत्व करू इच्छिणा-या व्यक्तिजवळ काही गुण विशेष, कर्तृत्व असणे आवश्यक असते. विशेषत: राजकीय क्षेत्रात नेतृत्व करीत असताना त्या प्रदेशातील लोकांवर प्रभाव असणे जरूरीचे असते. कारण नेतृत्व करणारा, म्हणजेच 'नेता' हा लोकांना मार्गदर्शन करणारा असतो, त्यांना आपल्या बरोबर घेऊन जाणारा असतो

व म्हणूनच त्याच्या जवळ नेतृत्व गुण असावे लागतात. उदा- उत्तम वक्तृत्व, कामाची धडाडी, लोकांमध्ये मिसळून त्याचे प्रश्न सोडविण्यासाठी घेतलेले कष्ट, प्रभावी व्यक्तिमत्व, चारित्र्य, चिंतनशिलता आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संघटन करण्याची कुशलता व आर्थिक बळ. हे गुणविशेष असणा-या व्यक्ति नेतृत्व करू शकतात. लोक त्यांच्या पाठीशी असतात.

तेलुगु समाजाचा ज्यावेळी विचार केला, तेंव्हा त्यांच्या नेतृत्वामध्ये यापैकी कोण-कोणते गुणविशेष आढळतात याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी यातील अनेक वैशिष्ठये दिसून आली. अर्थात सर्वच वैशिष्ठये सर्वच नेत्यांमध्ये आहेत, असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही. निरनिराळया व्यक्तिंमध्ये निरनिराळे गुणविशेष दिसून आले, की ज्या आधारावर त्यांनी नेतृत्व मिळविलेले आहे. काहींनी म्हणजे २५ ते ३५ व्यक्तिंनी वक्तृत्व शैलीने लोकांना जिंकले आहे. तर काहींनी केवळ आपल्या कामाने, लोकांमध्ये विश्वास निर्माण केलेला दिसतो. परन्तु बहुतांशी नेतृत्व हे आर्थिक बळावर आधारीत असलेले दिसले. त्यांनी केलेली केलेली शैक्षणिक व सामाजिक कामे आर्थिक बळाला आधार देताना दिसली. हे शेवटी जोडलेल्या व्यक्ती- परिचयांवरून दिसून येईल. थोडक्यात आपल्या कार्यकर्तुत्वाने त्यांनी समाजात आपले स्थान निर्माण केले व त्यामुळे तेलुगु समाजाचे नेतृत्व प्रस्थापित झालेले आढळते.

त्याचबरोबर एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, हा तेलुगु समाज आंध्रमधून आलेला, म्हणजे सोलापूरातील स्थानिक लोकांना पूर्णतया नवा. त्यांची भाषा नवी. पध्दती वेगळया. या वेगळेपणातून स्थानिक समाज व तेलुगु समाज यांच्यातील सूर जुळणे, एकमेकांची ओळख पटणे आवश्यक होते. व तसा प्रयत्न दोन्ही समाजांकडून झाल्यामुळे तेलुगु नेते येथील समाजात विश्वास निर्माण करू शकले. त्यांनाही येथील समाजाबद्दल आत्मियता वाटणे आवश्यक होते व यातूनच तेलुगु नेतृत्व पुढे येऊ शकले. याशिवाय राजकीय क्षेत्रात सहभागी होताना लोकांमध्ये राजकीय क्षेत्राबद्दल व मतदानाबद्दल जागृति घडवून आणणे, लोकमत आपल्या

बाजूस वळविणे आवश्यक असते. हे तेलुगु समाजातील नेतृत्वाला जमून गेलेले दिसते. कारण अगदी प्रारंभीच्या काळात राजकीय क्षेत्रात सहभागी होण्याची पुसटशीदेखील कल्पना त्यांच्या मनात नव्हती. केवळ उदरनिर्वाहाचे साधन शोधणे इतकेच ध्येय होते. ही परिस्थिती सन १८५० च्या आसपासची होती. १९०४ मध्ये प्रथमच त्यांचा प्रतिनिधी म्युनिसिपल मेंबर म्हणून निवडून आला व आज सन १९९० पर्यंत त्यांचे अनेक म्युनिसिपल मेंबर्स , नगरसेवक , २ नगराध्यक्ष, ४ आमदार व २ खासदार निवडून आलेले आहेत. यावरून त्यांनी मिळविलेल्या राजकीय क्षेत्रातील यशाची कल्पना येते.

तेलुगु समाजाचे नेतृत्व निर्माण होताना एक महत्वाचा अडथळा येण्याची शक्यता होती. तो म्हणजे भाषेचा . कारण येथील भाषा " मराठी " असून या विणकर समाजाची " तेलुगु " भाषेची एकता असेल तर लोकांना समजवून घेणे नेतृत्वाला शक्य होते. परन्तु भाषिक एकता, समानता नसेल तर मात्र अनेक अडचणी येतात. मुख्य म्हणजे नेतृत्व करणा-या व्यक्तिला, ज्यांचे नेतृत्व करावयाचे आहे त्या लोकांचे मत, अडीअडचणी, तक्रारी समजून घेता येणार नाहीत व पर्यायाने त्याचा परिणाम म्हणून लोक " नेता " म्हणून त्या व्यक्तिस निवडू शकणार नाहीत. परन्तु हा भाषेचा ~~मुद्दा~~, प्रश्न तेलुगु समाजाने सोडविलेला दिसतो. कारण त्यांनी येथे आल्यानंतर या प्रदेशाला आपले मानून,येथील भाषाही स्विकारली आहे. ही भाषेची अडचण दूर करून तेलुगु नेतृत्व येथे यशस्वी झालेले दिसते. नाहीतर भारतासारख्या खंडप्राय देशात असा प्रश्न निर्माण होणे संभाव्य असते.

भारत हे एक संघराज्य आहे. त्यामुळे भारतातील घटकराज्यांमध्ये सलोख्याचे व सहकार्याचे संबंध असणे केंव्हाही भारताच्या संघराज्याच्या हिताचे आहे. परन्तु याचा अर्थ असा नव्हे की, दोन भिन्न घटकराज्यांमध्ये अजिबात मतभेद नाहीत. काही प्रमाणात मतभेद निश्चित आहेत.परन्तु त्याचे स्वरूप संघर्षाचे मात्र नाही. यापैकी एक प्रश्न उपस्थित होऊ शकतो, तो भाषिक

अल्पसंख्यांकांच्या बाबतीत. भारतामध्ये भाषावार प्रांतरचना केल्यानंतर भाषिक अल्पसंख्यांकांचा प्रश्न निर्माण झाला. एका राज्यामधील अल्पसंख्यांकांची भाषा ही दुस-या राज्यामधील बहुसंख्यांकांची भाषा असू शकते. परन्तु म्हणून या बहुसंख्यांक भाषिक राज्याने अल्पसंख्यांक भाषिकांची, जे दुस-या राज्यात आहेत, हितसंबंधांची जबाबदारी उचलणे आपले कर्तव्य मानणे, हे भारताच्या अखंडतेच्या व एकात्मतेच्या - दृष्टिने चुकीचे ठरते. तर उलट अल्पसंख्यांक भाषिक ज्या राज्यात रहात आहेत, त्याच राज्याचे आपण घटक आहोत असे त्यांनी मानणे आवश्यक असते. त्याचबरोबर बहुसंख्यांक भाषिक राज्याने दुस-या राज्यात हस्तक्षेप न करणेच सर्वांच्या दृष्टिने हितावह असते. हे सर्व सांगण्याचे प्रयोजन म्हणजे, तेलुगु समाजाच्याबाबतीत हेच घडलेले आहे. वस्तुत: तेलुगु भाषा असूनही महाराष्ट्रात म्हणजेच सोलापूरमध्ये स्थायिक झाल्यानंतर या समाजाने आपणास महाराष्ट्राचाच एक घटक मानले आहे. स्वत:ची भाषा तेलुगु असूनही त्यांनी त्यांच्या सर्व व्यवहारात मराठीचाच स्विकार केलेला दिसतो. ही गोष्ट निश्चितच स्विकारार्ह आहे. कारण दुस-या राज्यात गेल्यानंतर स्वत:च्याच भाषेचा अट्टाहास न धरता तेथील भाषा स्विकारणे हा संघर्ष टाळण्यासाठी उत्तम उपाय आहे. इतकेच नव्हे तर याही पुढे जाऊन एक उदाहरण देता येते ते असे - कै. श्री. आशण्णा इराबत्ती यांनी आपल्या " माझ्या आयुष्यातील टिपणे" या आत्मचरित्रपर ग्रंथात सांगितले आहे की, " सन १९६४ मध्ये राज्यपाल श्री. चेरियन यांनी आपल्या भाषणाची सुरवात इंग्रजीतून केली, तेंव्हा विरोधी पक्षांच्या आमदारांनी त्यांना मराठीत भाषण करण्याची विनंती केली. ती राज्यपालांनी मान्य केली नाही, त्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षांनी जो सभात्याग केला, त्यात श्री. व्यंकप्पा मड्डूर यांनी हिरीरीने पुढाकार घेतला". वस्तुत: तेलुगु समाजातील असलेले आमदार श्री. मड्डूर यांनी मराठी भाषेचा आग्रह धरुन ख-या अर्थाने सोलापूरचे प्रतिनिधीत्व सिध्द केले असे म्हणता येते. असे जरी असले तरी, याचा अर्थ असा नव्हे की, त्यांनी म्हणजे तेलुगु समाजाने, स्वत:ला पूर्णपणे येथील स्थानिक समाजात विलीन करुन घेतले आहे, आपले स्वतंत्र

अस्तित्वच ठेवले नाही. उलट स्वत:ची वेगळी अस्मिता राखूनही सोलापूरच्या समाजात ते समरसून गेलेले दिसतात. ही गोष्ट वैशिष्ठ्यपूर्ण आहे. याशिवाय महत्वाचे म्हणजे या भाषिक प्रश्नात आंध्रनेही आपल्या अधिकाराने हस्तक्षेप केलेला नाही.

आपली स्वत:ची अस्मिता, स्वतंत्र अस्तित्व तेलुगु समाजाने जपले आहे. त्याची, त्यांनी केलेल्या प्रगतिवरून ओळख पटते. परन्तु तत्पूर्वी एक महत्वाची गोष्ट लक्षात घ्यावयास हवी. ती म्हणजे जसे तेलुगु समाजाने सोलापूरच्या स्थानिक समाजात समरसून जाण्याचा प्रयत्न केला. तसेच येथील स्थानिक समाजानेही त्यांना आपल्यामध्ये सामावून घेतले आहे. वेळोवेळी सहकार्य केले आहे.ते निर-निराळ्या क्षेत्रातील त्यांच्या संस्थांच्या वाटचालीच्या अभ्यासावरून दिसून आले. उदा - तेलुगु शिक्षण संस्थेच्या स्थापनेमध्ये व वाटचालीमध्ये तेलुगु लोकांबरोबरच इतर मराठी व्यक्तिंचाही समावेश होता. पद्मशाली शिक्षणसंस्थेच्या " रजतमहोत्सव स्मरणिकेत उल्लेख केला आहे की, या संस्थेच्या कुचन प्रशालेस शासकीय मान्यता मिळवून देण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्यात तात्कालीन मुख्याध्यापक श्री. सुर्वे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याच बरोबर प्रशालेचे कामकाज उत्तम चालावे यासाठी ती " सोलापूर एज्युकेशन सोसायटी " कडे सुपूर्त करण्यासाठी श्री. बेत वकील यांच्याबरोबरच श्री. रा.त्र्यं.लेले, श्री.जामदार वकील, मुख्याध्यापक श्री.रा.वा.शिरोळकर, सोलापूर एज्युकेशन सोसायटीचे तात्कालीन सचिव कै. श्री. ग.रा.कडुसकर यांनी मोलाचे सहकार्य केले. किंबहुना त्यांच्या प्रयत्नानेच संस्थेचे अस्तित्व टिकणे व ती भरभराटीस येणे शक्य झाले. त्याचबरोबर यशवंत सहकारी सुतगिरणीचे श्री. निवर्गी, यंत्रमाग सह.संस्थेचे श्री.कालाणी, सोलापूर जिल्हा औद्यो. सह. बँकेचे श्री. भुतडा, नागरी औद्यो.सह.बँकेचे श्री.मुतालिक देसाई इत्यादींचे सहकार्य व योगदान महत्वपूर्ण आहे. थोडक्यात तेलुगु नसलेल्या इतर व्यक्तिंच्या सहकार्याचा लाभ त्या समाजाच्या वाटचालीत त्यांना झाला हे सर्वच तेलुगु नेत्यांनी आपल्या मुलाखतीत मान्य केले आहे. याशिवाय सुरुवातीच्या

काळात या समाजाला येथे स्थायिक होण्यासाठी मदत केलेले मारवाडी समाजाचे लोक, येथिल गिरण्या, येथील शासन यांचेही त्यांना व सहकार्य लाभले. व म्हणूनच केवळ " भाषिक वेगळेपणा न दाखविता हा समाज येथे मिसळून गेला " एवढेच म्हणणे संकुचितपणाचे ठरेल. कारण या सर्वांच्या मदतीने तेलुगु समाजाने आपला आर्थिक विकास केला. अनेक विणकर सोसायटया, बँका, सूतगिरण्या, यंत्रमाग सोसायटया यांच्या स्थापनेमध्ये त्यांनी सतत परिश्रम घेतलेले दिसतात. त्याचा फायदा तर सोलापूरच्या लोकांना मिळाला हे खरेच. परन्तु महत्वाचे म्हणजे त्यामुळे सोलापूरच्या औद्योगिक व आर्थिक क्षेत्रात कमालीचे स्थित्यंतर झाले. त्यांनी निर्माण केलेल्या जेकार्ड चादरी, टर्किश अॅंड टॉवेल्स, वॉलहँगींग्जमुळे सोलापूरचे नाव देशभरातच नव्हे तर देशाबाहेरही, जगप्रसिध्द झाले आहे. त्यांनी आपल्या चादरींना कोणतेही तेलुगु वैशिष्ठयाचे नाव न देता " सोलापूर चादर" असेच दिले आहे.

तेलुगु समाजाचा हा अभ्यास करीत असताना त्यांची काही वैशिष्टये नजरेस आली. ती म्हणजे हा समाज अत्यंत गरीब, अंधश्रध्द, अशिक्षीत होता. "होता " म्हणण्याचे कारण आता त्यांच्या नेत्यांच्या प्रयत्नाने सुधारणा घडून येत आहेत. शिक्षणाचा प्रसार होतो आहे व त्याचे महत्वही कळले आहे. परन्तु त्याचबरोबर परिस्थितीनुरूप एक गुण दिसला तो म्हणजे अत्यंतिक कष्टाळूपणा. आपल्या अखंड कष्टाच्या आधारावर त्यांनी आज आपली प्रगति घडवून आणली. पूर्वी, सुरुवातीच्या काळात केवळ ५०० ते ७०० हातमाग होते. महायुध्द काळानंतर त्यांची संख्या ३२,००० पर्यंत पोचली. आज ती १०,००० च्या आसपास असली तरी यंत्रमागांची संख्या १९,००० आहे. दोन सूतगिरण्या, तीन बँका आहेत. यावरून त्यांनी केलेल्या कष्टपूर्वक प्रगतिची प्रचिती येते.

काही, म्हणजे दोन तीन तेलुगु नेत्यांनी मात्र खंत व्यक्त केली की, अलीकडील तरुण पिढीला मात्र या कष्टाच्या पारंपारिक व्यवसायात रस राहिला नसून त्यापेक्षा नोकरी करणे पसंत पडते. तेलुगु समाजातील काही टक्के तरुणांची जरी अशी प्रवृत्ती असली तरी बहुतांशी तरुण आपल्या पिढीजात घरच्या विणकामाच्या

व्यवसायास धरुन आहेत व प्रगति करीत आहेत.

समाजाच्या अनेक अनिष्ट रुढी व प्रथा आहेत. उदा- हुंडा पध्दती, बाल विवाह, व्यक्ति मृत्यु पावल्यास स्मशानातच कडूतोंड म्हणून जेवण देण्याची पध्दत, प्रेतयात्रेसमोर वाद्ये वाजविणे, आवाजाची दारु उडविणे, मद्य वाटणे, शिक्षणाचा अभाव, स्त्रियांबद्दलचा व त्यांच्या एकूणच विकासाबद्दलचा संकुचित दृष्टिकोन इ. अनेक रुढी जाणवू लागल्यावर समाजातील पुढारी मंडळींनी त्यात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यात बदल निश्चित जाणवत आहेत. शिक्षणाच्या प्रसारानेही हे साध्य झाले आहे. कारण शिक्षणामुळे व्यक्तिला योग्य-अयोग्य, बरे-वाईट गोष्टींची जाणीव होण्यास मदत होते. त्यामुळे तेलुगु समाजातील नव्या पिढीला समाजातील अनिष्ट रुढी नष्ट केल्या पाहिजेत व सुधारलेल्या जगाबरोबर गेले पाहीजे हे जाणवले आहे. या तेलुगु नेत्यांच्या यशावरही त्यांचे राजकीय नेतृत्व निर्माण झाले आहे.

तेलुगु नेत्यांच्या शिक्षण प्रसाराच्या या प्रयत्नामध्ये महाराष्ट्र शासनानेही मदत केलेली आढळली. ती म्हणजे त्यांना सवलती देऊन . मुळामध्ये या समाजात अशिक्षीतपणा असण्याचे कोणते कारण त्याचा विचार केल्यास मुख्य गोष्ट आढळली ती म्हणजे त्यांची गरीबी व त्यामुळे शिक्षणाचे महत्व जाणवले नाही. गरीबीमुळे, मूल थोडे मोठे झाले की घरच्या हातमागाच्या व्यवसायात गुंतविले जाई. कारण त्यामुळे उत्पन्नात थोडी फार वाढ होऊन चरितार्थास हातभार लागे. परन्तु अलिकडील काळात मात्र शिक्षणाचे महत्व पटलेले दिसते आहे व महत्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्र शासनाने या समाजातील बहुसंख्य समाजाला आर्थिकदृष्टया मागासवर्गामध्ये समाविष्ट केले आहे. सन १९६७ पासून इतर मागासवर्गीयां-प्रमाणेच सर्व सवलती त्यांना लागू केल्या आहेत. त्यामुळे शिक्षण घेणा-यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

तेलुगु नेत्यांनी केलेल्या या समाजिक, शैक्षणिक व आर्थिक कार्यातूनच त्यांचे नेतृत्व निश्चित झालेले आढळून येते. परन्तु केवळ इतकेच नेतृत्वासाठी

पुरेसे नसून त्यासाठी त्यांना त्यांच्या गुणविशेषांचा, आर्थिक बळाचा व इतरही घटकांचा आधार मिळालेला दिसून आला.

तेलुगु समाजाला आर्थिकदृष्टया मागासवर्गामध्ये समाविष्ट केले आहे. यावरूनच स्पष्ट होते, की हा समाज आर्थिकदृष्टया विकसित झालेला नाही. त्याचे रहाणीमान काळानुसार उंचावलेले नाही. मागील प्रकरणांवरून त्यांच्या आर्थिक विकासाची वाढती कमान दिसत असली तरी ती वर-वरची आहे. कारण मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढला तेंव्हा असे दिसले, की ही प्रगति या समाजातील काही मूठभर व्यक्तिंची आहे. सर्वसामान्य समाज मात्र काही प्रमाणात सुधारलेला असला तरी ब-याच अंशी गरीब व कष्टकरीच राहीला आहे. व मूठभर श्रीमंत बनलेल्या लोकांनी निरनिराळया संस्था स्थापन केल्या. त्यातून सामान्य जनांचा जरी काही प्रमाणात फायदा जरूर झाला असला, तरी श्रीमंत संचालक वर्गाला त्या गोष्टी जास्त लाभदायक ठरल्या. परन्तु एक गोष्ट आणखीन दिसून आली ती म्हणजे सधन वर्गाने, नेते मंडळींनी निर्माण केलेल्या औधोगिक व आर्थिक संस्थांमुळे रोजगार वृध्दी झाली व हजारोंनी लोकांना काम मिळाले. त्याचा राजकीय फायदा नेते मंडळींना मिळाला तो असा की, त्यांच्या नियंत्रणाखालीअसलेल्या या संस्थांमध्ये काम करीत असल्यामुळे कामगार वर्गाची एकगठ्ठा मते निवडणूकीत मिळविणे शक्य झाले. याला पुष्टी मिळते ती, निर-निराळया संस्थांच्या संचालकांची व चेअरमन- व्हाईस चेअरमन पदांवर असलेल्या व्यक्तिंची नावे पाहून. कारण यातील अनेक व्यक्तिंनी आपल्या या आर्थिक क्षेत्रातील महत्वाच्या स्थानामुळे राजकीय क्षेत्रातही यश मिळविलेले आहे. उदा- श्री. कुचन, श्री. सादुल, श्री. बोल्ली, श्री. पुल्ली, श्री. आडम इत्यादी. या व्यक्ति कोणत्या-नाकोणत्या महत्वाच्या पदांवर आहेत व राजकीय सत्तास्थानेही त्यांनी भूषविली आहेत. अर्थात असे जरी असले तरी, आपल्या राजकीय प्रभावाचा उपयोग त्यांनी समाजासाठीही म्हणजे हातमाग - यंत्रमाग व्यवसायांसाठीही केलेला आहे. हे निश्चित.

सामान्य समाज गरीब असल्याचा आणखी एक राजकीय फायदा तेलुगु नेत्यांना झाला आहे – तो संख्यात्मकदृष्टिने. नेतृत्वाने महत्वाची कामे केली व त्या आधारावर राजकीय यश मिळाले हे खरे असले तरी त्यामागे त्यांचे संख्याबळ आहे हे महत्वाचे आहे. भारतासारख्या लोकशाही देशात निवडणूक जिंकण्यासाठी ही सर्वात आवश्यक गोष्ट आहे. [ सध्याच्या केंद्रीय स्तरावरील घडामोडींवरुन त्याचा प्रत्यय येतो. ] हे संख्येचे पाठबळ तेलुगु नेत्यांमागे आहे याचे कारण म्हणजे त्यांच्या समाजातील विलक्षण संघटीतपणा व एकी. दुसरी गोष्ट म्हणजे अर्थशास्त्रातील " दारिद्रयाचे दुष्टचक्र " ही संकल्पना येथे काही प्रमाणात लागू होते. थोडक्यात ही संकल्पना अशी – दारिद्र्यामुळे माणसाला मुलभूत गरजा भागविणेही कठीण होते. त्यासाठी उत्पन्न मिळविणा-या व्यक्तिंची संख्या जास्त वाढावी म्हणून कुटुंबातील सदस्यसंख्या वाढते व ती वाढली म्हणून परत गरजा भागविणे कठीण झाल्याने दारिद्रयच रहाते. असे हे दुष्टचक्र चालू रहाते. तेलुगु समाजास देखिल ही संकल्पना लागू होते. कारण या समाजाने येथे आल्या पासून आपला पारंपारिक, हातमागावर कापड विणण्याचा व्यवसायच चालू ठेवला. या व्यवसायाला मनुष्य बळ जास्त लागते. त्यामुळे कुटुंबातील सदस्यसंख्याही मर्यादित राहू शकली नाही व त्याचा परिणाम म्हणून पुन्हा गरीबी हे दुष्टचक्र चालू राहिले. याशिवाय अशिक्षीतपणामुळेही कुटुंब नियोजन उपक्रमाला प्रतिसाद मिळाला नाही. या कारणांमुळे तेलुगु समाजाची जनसंख्या सतत वाढत राहिली. हे आजच्या त्यांच्या संख्येवरुन दिसून येते. प्रारंभी केवळ हजार –बाराशे असलेली त्यांची लोकसंख्या आता दोन ते अडीच लाखांपर्यंत वाढली आहे. म्हणजेच शहराच्या एकूण लोकसंख्येच्या जवळ –जवळ २५% आहे. त्यामुळे निवडणूकीच्या वेळी ही वाढती लोकसंख्या राजकीय नेत्यांना फायदेशीर ठरते. कारण लोकसंख्या वाढल्यामुळे मतदारांमध्ये वाढ झाली व अशी आपल्या समाजाची एकगठ्ठा मते नेत्यांना मिळणे शक्य होते.

तेलुगु समाजाने आर्थिक क्षेत्रात मिळविलेल्या प्रचंड बळाचाही उपयोग नेत्यांना आपला प्रभाव राजकीय क्षेत्रात वाढविण्याच्यादृष्टीने महत्वाचा ठरतो.

त्यांनी निर्माण केलेल्या बँका, सूतगिरण्या, सहकारी संस्था यांच्यातून मिळणा-या प्रचंड आर्थिक उत्पन्नामुळे तेलुगु नेत्याचे राजकारण व राजकीय स्थान पक्के झालेले दिसते. इतकेच नव्हे तर सोलापूर शहरातील काँग्रेस पक्षाला आर्थिक मदतीचा ओघ तेलुगु समाजाकडून असल्याने एक प्रकारचे दबावगटाचे महत्व या समाजाला निर्माण झाले आहे. त्यांच्या मतांना कमालीचे महत्व आले आहे. किंबहुना असेही म्हणता येते की त्यांच्यावर विशेषत: काँग्रेसचे राजकारण आधारलेले आहे. कारण लोकशाहीत आर्थिक बळ महत्वाचे ठरते.

तेलुगु नेत्यांचा मुरब्बीपणाही त्यांच्या यशाला आधार आहे. गेली अनेक वर्षे परंपरेने तेलुगु समाजातील अनेक लोक राजकारणात असल्याने एक प्रकारचा मुरब्बीपणा त्यांच्यामध्ये निश्चित दिसून येतो. त्याचे एक छोटे उदाहरण देता येते ते असे - आपल्या आर्थिक बळावर ज्यावेळी तेलुगु नेत्यांनी राजकीय सत्ता काबिज करण्यास सुरुवात केली, त्यावेळी त्यांनी आपल्या सोयीनुसार मतदारसंघांची फेर-रचना केली व आणखी यश खेचून घेतले. त्याचबरोबर आणखी एका गोष्टीचा त्यांना फायदा झाला तो म्हणजे येथील स्थानिक समाजात पडलेली फूट व सर्वमान्य सामर्थ्यवान नेतृत्वाचा अभाव.

तेलुगु नेत्यांच्या यशामध्ये काही प्रमाणात वाटा स्त्रि-वर्गाचा आहे. कारण तेलुगु स्त्रिया या फारशा पुढे येत नाहीत. राजकीयदृष्टया जागरुकही नाहीत. जागरुकतेचे प्रमाण १% ते २% आहे. परन्तु आपल्या समाजाचा माणूस निवडून यावा, यासाठी त्या मतदान करतात. एरवी त्यांचा राजकीय सहभाग अजिबात आढळत नाही. जागरुकतेचे त्यांचे प्रमाण १% ते २% असले तरी मतदान मात्र ५०% ते ६०% होते.

थोडक्यात संघटीतपणा, समाजासाठी केलेले काम, आर्थिक प्रबलता, मुरब्बी राजकारण इ. कारणांनी तेलुगु नेते राजकीय क्षेत्रात यशस्वी झालेले दिसतात.

आजपर्यंत पूर्वभागामधून केवळ कॉंग्रेसचेच नेते निवडून आलेले दिसतात. एखाद-दुसरा अपवाद कम्युनिस्ट पक्षाचा आहे. परन्तु तेलुगु समाजाच्या, नेत्यांच्या सहकार्य व कामामुळे सोलापूर हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला मानला गेला. वयस्कर मंडळी कॉंग्रेसशी एकनिष्ठता बाळगून आहेत. कारण त्यातील बहुतेक मंडळी व्यक्ति स्वातंत्र्य लढयात राष्ट्रीय कॉंग्रेसतर्फे उतरली होती. शिवाय कॉंग्रेस पक्ष सतत सत्तेवर राहिल्याचा त्यांना आर्थिकदृष्टया फायदा झाला. त्यामुळे वयस्कर मंडळी व काही प्रमाणात तरूणही कॉंग्रेसमध्ये समाविष्ट आहेत. कॉंग्रेसतर्फे निवडणूका लढवितात. कॉंग्रेसने स्विकारलेल्या समाजवादी धोरणामुळे साधारण १९६०-६२ पर्यंत प्रभावी असलेला कम्युनिस्ट पक्ष निष्प्रभ ठरला व कॉंग्रेस प्रभावी राहिली. परन्तु शोध निबंधासाठी मिळविलेल्या माहितीवरून तेलुगु राजकीय क्षेत्रातील एक बदल निश्चितपणे जाणवत आहे. तो म्हणजे अगदी अलिकडील काळात परिस्थीतीत फरक पडून भा.ज.प.व शिवसेना या पक्षांकडे तरूण वर्गाचा कल झुकतो आहे. त्याची दोन वेगवेगळी कारणे तेलुगु नेत्यांच्या मुलाखतीमधून पुढे आली. एक म्हणजे २५% तेलुगु नेत्यांनी मान्य केले की,"भा.ज.प.व शिवसेना या पक्षांनी केलेले हिंदुत्वाचे आव्हान व जोष तरूणांना आकर्षित करतो आहे. त्याचबरोबर त्याला आणखी जोड मिळते, ती कॉंग्रेसच्या भ्रष्टाचारी व अल्पसंख्यांकांचा अनुनय करण्याच्या धोरणाची." म्हणूनच कॉंग्रेसच्या या बालेकिल्ल्यात ते दोन पक्ष आपले पाय रोवत आहेत. परन्तु इतर तेलुगु कॉंग्रेस नेत्यांच्या मते,"असे काही नसून केवळ बदल हवा म्हणून असे घडते आहे. म्हणजे फार दिवस कोणतीच गोष्ट राहिलेली लोकांना आवडत नाही. कॉंग्रेस पक्षच सतत वर्षानुवर्षे सत्तेवर असल्याने लोकांना आता बदल हवा आहे. म्हणूनच तरूण वर्ग भा.ज.प.- शिवसेनेकडे झुकतो आहे." थोडक्यात म्हणजे कारण कोणतेही असले तरी बदल निश्चित दिसून येतो आहे. त्याची दृष्य साक्ष म्हणजे फेब्रु-१९९० च्या विधानसभा निवडणूकीत पूर्व भागात प्रथमच भा.ज.प.च्या उमेदवाराचा विजय झाला आहे. असे असले तरी खासदारपद मात्र अजून कॉंग्रेसकडेच आहे.

तेलुगु नेत्यांनी निरनिराळ्या पक्षांच्या सदस्यत्वाखाली सोलापूरचे स्थानिक, राज्य व केंद्रीय पातळीवर प्रतिनिधीत्व केलेले आहे. व अजूनही करीत आहेत. परन्तु त्यांत केंद्रीय स्तरावर खास दृष्यस्वरूप फायदा झाला नसला, तरी अप्रत्यक्ष व आर्थिक फायदा नक्कीच झाला आहे. विशेषत: आर्थिक क्षेत्रातील फायदा महत्वपूर्ण आहे.

स्थानिक पातळीवर प्रतिनिधीत्व व नेतृत्व करणा-या तेलुगु राजकीय नेत्यांच्या मुलाखतींमधून दोन गोष्टी नजरेस आल्या. एक म्हणजे निवडून आलेले नगरसेवक आपल्या पदाचा उपयोग करून काम करतात. परन्तु ते वार्ड पुरते म्हणजेच पर्यायाने तेलुगु विभागापुरतेच [ पूर्व भाग ] मर्यादित रहाते. संपूर्ण सोलापूर शहरासाठी त्याचा विचार करता येणार नाही. दुसरे म्हणजे शहरासाठी महापौर पदावरून काम करता येत असले तरी, बहुतेक सर्वच महापौर पद भूषविलेल्या तेलुगु व्यक्तिंच्या बोलण्यातून, त्याचबरोबर त्याचा अभ्यास करणा-या इतर व्यक्तिंच्या बोलण्यात आले की, महापौरावर अनेक बंधने आहेत, मर्यादा आहेत, म्हणावा तितका अधिकार नाही. नगरसेवकांकडून, इतर नेत्यांकडून सहकार्य मिळाले तरच काम करता येते. निर्णय घेता येतात. परन्तु त्यांनी खंत व्यक्त केली की, या पदावरून आम्ही खास असे काम करू शकलो नाही. महापालिकेतील वातावरणाचाही हा परिणाम आहे.

सध्या निवृत्त असलेल्या परन्तु पूर्वी राजकारणात सक्रीय सहभागी असलेल्या एका व्यक्तीने असेही सांगितले की, "महापौर होण्यापेक्षा पक्षनेता म्हणून काम करणे जास्त चांगले, कारण हरेक मार्गांचा अवलंब करून, दबावतंत्राचा वापर करून कामे पूर्ण करता येतात." अशा त-हेने जरी बंधने असली, अडथळे असले तरी तेलुगु नेतृत्वाने समाजासाठी काम करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

कामगारांच्या बाबतीत मात्र काहीसे वेगळे चित्र दिसले. कामगार हा अजूनही गरीबीचे जीवनच जगतो आहे. त्यांच्यासाठी कम्युनिस्ट पक्षातर्फे,

कामगार संघटनांतर्फे प्रयत्न करुनही म्हणावे तसे यश आलेले दिसत नाही. या बाबतीत , २ जानेवारी १९९० च्या दै. संचार मध्ये कॉम्रेड रामभाऊ म्हेत्रस यांनी जो श्री. व्यंकप्पा मडूर यांच्यावर लेख लिहीला आहे. त्यात ते लिहीतात- " स्वातंत्र्यानंतरच्या ४२ वर्षांनंतर कामगार वर्गाची काय अवस्था आहे याचा विचार करावयाचा झाल्यास,स्वातंत्र्याचा उद्देश ख-या अर्थाने सफल झाला नाही असे म्हणावे लागेल. सर्वसामान्य लोकांचे व कामगारांचे मूलभूत प्रश्न सुटलेले नाहीत असेच म्हणावे लागेल. हातमाग, यंत्रमाग कामगार अदयापही झोपड-पट्टीतूनच रहातो व आपल्या तुटपुंज्या दैनिक मजुरीवर गुजराण करतो.त्यांच्या रहाणीमानात काहीही सुधारणा नाही. हे या सरकारला व समाजाला लांछ-नास्पद आहे. एकीकडे आर्थिक विषमता व दुसरीकडे सामाजिक विषमता या कात्रित समाज सापडलेला आहे. यात सुधारणा घडवून आणल्या पाहीजेत. अंधश्रध्दा, जुन्या सामाजिक रुढी पुसून टाकल्या पाहीजेत. तरच समाज सुधारेल. "

सर्व साधारण कामगारांची अवस्था काय आहे हे या परिच्छेदावरुन समजून येते. यातील कामगार लढा देण्याचा प्रयत्न करतोच आहे. परन्तु आणखी एक वैशिष्ठयपूर्ण गोष्ट जाणवली ती म्हणजे - कै. सिद्रामप्पा फलमारी स्मृति स्मरणिकेतील आमदार कॉम्रेड व्यंकप्पा मडूर यांनी आपल्या लेखात सांगितले आहे की, " सन १९३८ मध्ये सोलापूरातील विडीकामगार महिलांनी संप केला. तो मजुरीच्या वाढीकरीता होता. भारतामध्ये तो पहिलाच महिलांचा संप असावा त्यामुळे तो सर्वत्र गाजला. त्यात श्रीमती इरम्मा संभारम, सौ.अंबव्वा चिप्पा, श्रीमती मुनम्मा दुडम अशा काही महिलांनीं अटकही झाली होती. महिनाभर चाललेल्या या संपामध्ये मनाप्रमाणे निर्णय झाला नसला तरी त्यानिमित्ताने महिलादेखिल लढायला शिकल्या. त्यांनी संघटना बनविली. त्याचा फायदा आजही होत आहे." तेंव्हापासून म्हणजे सन १९३८ पासून आजपर्यंत फारशी प्रगति महिला-कामगार लढयात झाली नसली तरी,अलिकडील काळात मात्र लाल बावटा कामगार संघाची महिला आघाडी बरीच प्रगति करीत आहे. लढयात सक्रीय सहभागी होत आहे.

अशा त-हेने तेलुगु नेतृत्वात काही प्रमाणात त्रुटी जरी असल्या, उणिवा जरी असल्या तरी त्यामुळे त्यांनी आजवर केलेले काम, मिळविलेली लोकप्रियता व निर्माण केलेले स्थान याचे महत्व निश्चितपणे आहे. ते कमी लेखता येणार नाही.

शोध निबंधातील प्रकरणांवरुन वरील काही निष्कर्ष निष्पन्न होतात. त्यातील सर्वात महत्वाचा व अनुकरणीय निष्कर्ष जो प्रथम पाहिला त्याचा पुनरुल्लेख येथे शेवटी करणे उचित ठरेल. तो म्हणजे - तेलुगु समाज मागील शतकाच्या मध्यास येथे आला तेंव्हापासून भाषिक अल्पसंख्य आहे. परन्तु तरीसुध्दा येथे आल्यानंतर त्यांनी येथील प्रमुख, म्हणजे " मराठी " भाषेचा स्विकार आपल्या व्यवहारात, एवढेच नव्हे तर शिक्षण संस्था, आर्थिक संस्था व औद्योगिक अशा सर्वच संस्थांमध्ये केला. व स्वत:ला ते आंध्रचे न समजता महाराष्ट्रीय मानतात. महाराष्ट्राचा घटक मानतात. दुस-या राज्यात स्थलांतरीत होऊन, स्थायिक होऊन, तेथेच मिसळून जाण्याची, स्थानिक समाजाशी मिळवून घेण्याची प्रवृत्ती भारतातील सर्वच घटकराज्यांमधील लोकांनी अनुसरली, तर संघर्षाचे, मतभेदाचे प्रश्नच निर्माण होणार नाहीत. पर्यायाने आपल्या राष्ट्राची एकात्मता अबाधित, अभेद्य व अखंडीत राहिल.